MHRG120001152023

नियमीत दिवाणी दावा क्र.९/२०२३
सलीम व इतर वि. इकबाल व इतर

**निशाणी क्र.१९ कडील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ ते २ यांनी त्यांच्या विरुध्द दिनांक ०७/०७/२०२३ रोजी झालेला विना कैफियत आदेश रद्द करून मिळण्यासाठी दाखल करण्यात आला आहे. अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, प्रतिवादी हे दाव्याकामी दिनांक ३१/०३/२०२३ रोजी हजर झाले होते. परंतू, प्रतिवादी यांना काही महत्वाची कागदपत्रे मिळाली नसल्याने त्यांना कैफियत दाखल करता आली नाही. तसेच प्रतिवादी हे वयस्कर असून दरम्यानचे कालावधीत प्रतिवादी क्र.२ या आजारी होत्या. त्यामुळे कागदपत्रे काढण्यास उशिर झाला. त्यामुळे त्यांनी प्रस्तूतचा अर्ज मंजूर करण्याची मागणी केली आहे. वादी यांनी निशाणी क्र.२१ कडे आपले म्हणणे दाखल करून प्रतिवादीने मुदतीत कैफियत दाखल केली नाही. मुदतीत कैफियत दाखल का करता आली नाही याचा खुलासा सुध्दा त्यांनी अर्जात केलेला नाही. विलंबाचे कारण मोघम स्वरुपाचे आहे. प्रतिवादी केवळ दाव्यास लांबविण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यामुळे त्यांनी प्रसतूतचा अर्ज फेटाळण्याची मागणी केली आहे. तसेच न्यायालय अर्ज मंजूर करण्याच्या मतास आल्यास प्रतिवादीस रक्कम रुपये ३०००/- कॉस्ट नुकसान भरपाई म्हणून वादीस देण्याचा आदेश करण्यात यावा अशी मागणी केली आहे.

२. प्रतिवादीं तर्फे विद्वान वकील श्री. पी. पी. पोतदार आणि वादीं तर्फे विद्वान वकील श्री. जे. ए. घट्टे यांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे

दिसून येते की, दिनांक ०७/०७/२०२३ रोजी प्रतिवादी क्र.१ व २ यांनी मुदतीत आपली कैफियत दाखल केली नसल्यामुळे त्यांच्याविरुध्द विना कैफियत आदेश पारीत झाला आहे. अर्जात विलंबाबाबत नमूद करण्यात आलेले कारण संयुक्तीक नसले तरी दाव्याचा निकाल गुण-अवगुणावर लागण्यासाठी न्यायाच्यादृष्टीने प्रतिवादींना आपली कैफियत मांडण्याची संधी मिळणे आवश्यक आहे. तसेच प्रतिवादींना कैफियत दाखल करण्याची संधी दिल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे प्रतिवादीं विरुध्द झालेला विना कैफियत आदेश खर्चासह रद्द करणे आवश्यक असल्याचे दिसून येते. करीता मी खालील आदेश पारीत करतो-

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी वादीस एकत्रीत ३००/- रुपये खर्चाच्या स्वरुपात देण्याच्या अटीवर त्यांच्या विरुध्द दिनांक ०७/०७/२०२३ रोजी निशाणी क्र. १ कडे पारीत करण्यात आलेला विना कैफियत आदेश रद्द करुन त्यांना कैफियत दाखल करण्याची परवानगी देण्यात येते.

(खुल्या न्यायालयात जाहिर)

SANDEEP G SARODE
Digitally signed by SANDEEP G SARODE
Date: 2023.10.05 19:59:25 +0530

(सं. गं. सरोदे)

दिनांक : ०५/१०/२०२३

दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, मुरूड